# BDC LIBRARY

## New Paper Clipping

*A.Y. 2024-2025*

# कोयना ॲकॅडमीच्या यशाची परंपरा यापुढेही कायम राहील : अमरसिंह पाटणकर



यशस्वी विद्यार्थी व पालकांच्या सत्कारप्रसंगी अमरसिंह पाटणकर, संजीव चव्हाण, समवेत प्राध्यापक व मान्यवर.

पाटण, दि. २० : स्पर्धात्मक युगात जे.ई.ई., आय.आय.टी .तसेच वैद्यकीय शिक्षण प्रवेशासाठी नीटसारख्या परीक्षांना अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. यासाठी जोखीम पत्करून मुलांना कराड, पुणे, मुंबई, सांगली, लातूरपासून ते अगदी राजस्थानातील कोटा यासारख्या शहरात लाखो रुपये खर्च करून ठेवावे लागत असताना त्या तुलनेत कोयना ॲकॅडमीतील विद्यार्थी अत्यंत कमी खर्चात, जोखीम न घेता पालकांच्या डोळ्यासमोर जे.ई.ई., आय.आय.टी., नीटसारख्या परीक्षेत उज्वल यश संपादन करत आहेत. विद्यार्थी अभियांत्रिकी, वैद्यकीय व आय.आय.टी.ला जात आहेत हे अभिमानास्पद असून कोयना ॲकॅडमीच्या यशाची परंपरा यापुढेही कायम राहील, असा विश्वास कोयना एज्युकेशन सोसायटीचे जनरल सेक्रेटरी अमरसिंह पाटणकर यांनी व्यक्त केला.

कोयना एज्युकेशन सोसायटीच्या कोयना ॲकॅडमीमधील विद्यार्थ्यांनी जे.ई.ई. मेन्स परीक्षेत उज्वल यश संपादन केले. त्यानिमित्ताने विद्यार्थी व पालक यांच्या सत्कारप्रसंगी ते बोलत होते. यावेळी संस्थेचे संचालक संजीव चव्हाण, प्रा. बी. एन. पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या चेतन मोरेसह ओंकार कदम, अथर्व राऊत, निखिल जाईगडे व सोहन सूर्यवंशी या विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा सत्कार करण्यात आला.

अमरसिंह पाटणकर म्हणाले, शिक्षणासाठी लाखो रुपये खर्च करून मुलांना बाहेरील जिल्ह्यात, धोक्यात ठेवण्यात येत असताना संस्थेने कोयना ॲकॅडमीसारखे अद्ययावत, गुणवत्तापूर्ण शैक्षणिक दालन उपलब्ध करून दिले आहे. संस्थेने तसेच पालकांनी दाखवलेला विश्वास येथील शिक्षकांनी तसेच विद्यार्थ्यांनी सार्थ ठरवून अभिमानास्पद कामगिरी केली आहे. शिक्षणातून संस्कारित पिढी घडविण्याचे आव्हान समाजापुढे आहे. जिद्द, चिकाटी, परिश्रम आणि अभ्यासातील सातत्यच विद्यार्थ्यांच्या जीवनाला दिशा देईल, असे त्यांनी सांगितले.

संजीव चव्हाण म्हणाले, कोयना ॲकॅडमीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना अद्ययावत सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. जे.ई.ई तसेच नीट परीक्षेसाठी शिक्षक व विद्यार्थी कष्ट घेत असून कोयना ॲकॅडमी प्राप्त करत असलेले यश हे त्यांनी घेतलेल्या कष्टाचे फळ आहे. मुलांच्या उज्वल भवितव्यासाठी संस्था आपल्या पाठीशी खंबीरपणे उभी असून कोयना ॲकॅडमीचे सर्व घटक सातत्याने परिश्रम घेत असल्याने कोयना ॲकॅडमीच्या निकालाची परंपरा गौरवास्पद असल्याचे सांगितले.

यावेळी माजी उपसरपंच चंद्रकांत मोरे, नगरसेवक संजय इंगवले, माजी ग्रामपंचायत सदस्य राजाभाऊ कांबळे, बाळासाहेब पवार, बळीराम सुर्वे, अनिल बोधे तसेच पालक व विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. प्रा. सत्यजित माने यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्रा. पूनम पाटील यांनी सूत्रसंचालन केले. चंद्रशेखर ढवळे यांनी आभार मानले. कार्यक्रमास सामाजिक कार्यकर्ते विजयसिंह पाटणकर, धैर्यशील पाटणकर, पंडितराव मोरे, अनिल भोसले, प्रकाश जाधव, लक्ष्मण चव्हाण आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवर, ॲकॅडमीचे सर्व प्राध्यापक, पालक, विद्यार्थी उपस्थित होते.